सत्यमेव जयते

# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग

# वार्षिक अहवाल

# सन २०२३ - २०२४

## (कालावधी ०१/०४/२०२३ ते दिनांक ३१/०३/२०२४

**नवीन प्रशासकीय इमारत खोली क्र. ३०७, तिसरा मजला, विधान भवनासमोर,**

**पुणे ४११००१**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | मा.अध्यक्षांचे मनोगत | १ |
| २. | प्रस्तावना | २ |
| ३. | आयोगाच्या स्थापनेपासून आयोगांच्या नियुक्तीचा तपशील | ३-५ |
| ४. | विद्यमान आयोगाची रचना | ६-७ |
| ५. | विद्यमान आयोगाने तयार केलेले मागासवर्गीयांकरिता गुणांचे निकष | ८ |
| ६. | आयोगाच्या कार्यालयाची प्रशासकीय रचना | ८ |
| ७. | आयोगाच्या कामकाजाची पध्दत | ९ |
| ८. | दिनांक १.४.२०२३ ते दिनांक ३१.३.२०२४ पर्यंत आयोगाच्या संपन्न झालेल्या बैठकांचा तपशील | १०-११ |
| ९. | उपसमितीकडून घेण्यात आलेल्या सुनावण्या / क्षेत्रपाहणी | १२-१३ |
| १०. | मराठा समाजाच्या मागासलेपणाबाबतचा अहवाल | १४ |
| ११. | सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात खर्चाची माहिती | १५ |

# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे

## -: मनोगत :-

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या व्यतिरिक्त राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गात समावेश करण्यासाठी किंवा त्या प्रवर्गातून एखादी जात वगळण्यासाठी किंवा तदनुषंगिक बाबींची तरतूद करण्याकरिता सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३४ अन्वये गठित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सादर करताना मला आनंद होत आहे. आयोगाचे कामकाज हे महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००५ मधील तरतुदीप्रमाणे चालते.

सदर अहवाला मध्ये राज्यातील नागरिकांच्या वर्गाचा मागासवर्ग म्हणून सूचीमध्ये अंतर्भाव करण्यासंदर्भात आयोगाने केलेल्या कार्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. तसेच या अहवालात वेळोवेळी करण्यात आलेली आयोगाची रचना, आयोगाची कार्यपध्दती, नागरिकांचा मागासवर्ग निश्चित करण्याचे निकष व पध्दती या संदर्भात सविस्तर विवेचन केले आहे.

आयोगाने सन २०२३-२४ या वर्षामध्ये एकूण २३ बैठका घेतल्या. तर याच कालावधीमध्ये आयोगाच्या उपसमित्यांनी विविध जातसमुहांच्या सुनावण्या, बैठका, चर्चा व क्षेत्रपाहणी करण्याकरिता एकूण १५ दौरे केले. आयोगाकडे प्राप्त प्रकरणांमध्ये अभ्यासाअंती अहवाल सादर करण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात असून लवकरच काही समूहांच्या मागण्यांबाबतचे आयोगाचे अंतिम अहवाल शासनास सादर करण्यात येतील.

महाराष्ट्र शासनाकडील पत्र क्र.MISC-२०२३/CR ११५/१६ C, दि.१३ नोव्हेंबर, २०२३ अन्वये मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याचे काम महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे सोपविण्यात आले होते. त्या अनुषंगाने आयोगाने मराठा समाजाच्या मागासलेपणाचा अहवाल राज्य शासनास दिनांक १६.२.२०२४ रोजी सुपूर्त केला आहे.

नागरिकांच्या मागासवर्गाच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीचा नियमितपणे आढावा घेण्यासाठी, दर्जाविषयीची आधार सामग्री तयार करण्यासाठी कायद्यातील तरतुदीप्रमाणे कार्य करण्याचा आयोगाचा मानस आहे.

न्या. सुनील बाळकृष्ण शुक्रे (निवृत्त)
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग

# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे

## -: प्रस्तावना :-

केंद्र शासनाने सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या वर्गास नागरी पदे व सेवा यामध्ये २७ टक्के आरक्षणाचे आदेश निर्गमित केले होते. सदर आदेश निर्गमित झाल्यानंतर इंद्रा सहानी (Indra Sawhney) यांनी रिट पिटीशन क्र.९३०/९० केंद्र शासन विरुध्द सर्वोच्च न्यायलयात दाखल केली होती, त्याप्रमाणे इतरांनी देखील रिट पिटीशन दाखल केल्या होत्या. त्यामध्ये दिनांक १६/११/१९९२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या दिनांकापासून ८ महिन्याच्या कालावधीत केंद्र शासनाने व राज्य शासनाने सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या जातींचा समावेश करण्यासाठी एक कायमस्वरुपी यंत्रणा उभारावी, या निर्देशास अनुसरुन राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गात समावेश करण्यासाठी किंवा त्या प्रवर्गातून एखादी जात वगळण्यासाठी आलेल्या मागण्या व तक्रारींची तपासणी करण्यासाठी तसेच मागासवर्गीयांच्या यादीमध्ये (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता) सामाजिक, आर्थिक निकषानुसार प्रगत व उन्नतगट किंवा व्यक्ती निर्धारीत करुन संबंधीत जात वगळण्यासाठी अभ्यासपुर्ण शिफारस राज्य शासनास करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी-१०९३/७४९२/प्र.क्र.२८/मावक-५, दिनांक १५/०३/१९९३ अन्वये शासनाने एका स्थायी समितीची स्थापना केली होती. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कतिक कार्य व क्रिडा विभाग क्रमांक. सीबीसी- १०९३/७४९२/प्र.क्र.२८/ मावक-५,दिनांक १९/०५/१९९५ अन्वये स्थायी समितीचे नामकरण राज्य मागासवर्ग आयोग असे करण्यात आले. सदरचा आयोग कायम स्वरुपी असून आयोगाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र आहे.

स्थायी समितीचे रुपांतर आयोगामध्ये होण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाकडे यापूर्वी राज्यातून विविध जाती जमातींची त्यांना मागासवर्गात समाविष्ट करण्याबाबतची एकूण १४७ निवेदने प्राप्त झाली होती. ती सर्व निवेदने प्रा.आर.के. मुटाटकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या तज्ञ समितीकडे अभ्यासासाठी व अंतिम शिफारशीसाठी पाठविण्यांत आली होती. त्याचा अभ्यास करुन शिफारशीसह त्यांनी शासनाकडे अहवाल सादर केला होता. शासनाने १४७ प्रकरणांतील समितीच्या शिफारशी आयोगाकडे पुनर्तपासणीसाठी पाठविल्या. आयोगाच्या स्थापनेनंतर १९९५ ते २०२४ पर्यत विविध आयोगाच्या कार्यकालात एकूण ५७ अहवाल राज्य शासनास सादर केलेले आहेत.

## मा. न्यायमूर्ती (निवृत्त) श्री.एस.एन.खत्री यांचे अध्यक्षतेखालील आयोग

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्र.सीबीसी-१०९३/७४९२/प्र.क्र.२८/ मावक-५ दिनांक २२/६/१९९५ अन्वये राज्य मागासवर्ग आयोगाच्या मा.अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती दोन वर्षाकरिता करण्यात आलेली होती. दिनांक २२.६.१९९५ ते दिनांक २८.५.२००३ पर्यंत आयोगाचे कामकाज मा.न्यायमूर्ती एस. एन. खत्री (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आलेले होते.

## मा. न्यायमूर्ती खत्री आयोगाने अवलंबिलेली कार्यपद्धती

१. इंद्रा सहानी विरुध्द भारत सरकार ए.आय.आर.१९९३ या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयासमोर उदभवलेले मुददे, त्यावर न्यायाधीशांनी दिलेली उत्तरे, या आयोगाचे प्रयोजन व कर्तव्ये, आयोगाने आरक्षणाची प्रकरणे निकालात काढतांना कोणती प्रक्रिया राबवावी व काय खबरदारी घ्यावी या प्रश्नावर आयोगाने एक पुस्तिका तयार केली असून त्यात नमुद केल्याप्रमाणे आयोगाने कायदा व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

२. आरक्षणाची कामगिरी भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद १६(४)च्या विहीत चौकटीत व्हावयास पाहिजे हे इंद्रा सहानी विरुध्द भारत सरकार या निकालात स्पष्ट करण्यांत आलेले आहे. हा उपबंध लागू होण्यासाठी दोन अटी पूर्ण होणे आवश्यक आहे (१) ज्या संवर्गाचे आपण आरक्षण करीत आहोत तो नागरिकांचा मागास संवर्ग (बॅकवर्ड क्लास ऑफ सिटीझन) असावयास हवा म्हणजेच आरक्षण व्यक्तीगत स्तरावर करता येणार नाही, त्यासाठी मागासलेल्या नागरिकांचा गट असावयास हवा आणि (२) त्या संवर्गाचे राज्य सेवामध्ये समुचित प्रमाणात प्रतिनिधित्व नाही असे राज्य सरकारचे मत असावयास हवे.

३. विचाराधीन समूह/संवर्ग अनुच्छेद १६(४) च्या कसोटीस उतरतो की नाही यासाठी सर्वेक्षण करण्यात येते, वास्तविक सर्वेक्षण म्हणजे काय करावयाचे, कोणती कार्यपध्दती अवलंबावयाची याबाबत मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यात येते. ही राबविलेली प्रक्रिया रास्त असावयास हवी आणि विचाराधीन क्षेत्रातील इतर समुहाशी तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी पुरेशी सामग्री उपलब्ध असली पाहिजे. ही जबाबदारी पार पाडताना न्याय व रास्त दृष्टीकोनाचा अवलंब करणे आवश्यक आहे. मंडल आयोगाने त्यांच्या सर्वेक्षणाकरीता सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्वरुपाच्या कसोटया तयार केलेल्या होत्या.

सदर आयोगाच्या कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्यापुरते मागासलेपण ठरविण्यासाठी आयोगाने एकूण १६ गुणांचे निकष (सामाजिक ९ गुण, शैक्षणिक ४ गुण व आर्थिक ३ गुण) सन १९९४ मध्ये तयार केले होते. त्यानुसार गुणांकन करुन विविध जातीसमूहांचे अहवाल शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. तदनंतर मा.न्यायमूर्ती खत्री आयोगाने त्यामध्ये सुधारणा करुन मागासलेपण ठरविण्यासाठी एकूण २३ गुणांचे निकष ठरविले होते.

सदर आयोग सन २००४ पर्यंत कार्यरत होता. सदर आयोगाने अहवाल क्र.१ ते १२ शासनास सादर केलेले आहेत.

## मा. न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. रमेश माधव बापट यांच्या अध्यक्षतेखालील आयोग

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाकडील शासन निर्णय क्र.सीबीसी-१४/ २००१/प्र.क्र.१००/मावक-५, दिनांक २३.८.२००४ अन्वये मा.न्यायमूर्ती श्री.रमेश माधव बापट (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली ३ वर्षाकरिता आयोग पुनर्गठित करण्यात आला. त्यात प्रत्येक महसुली विभागातून एक सदस्य या प्रमाणे सहा महसुली विभागातून सहा सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली होती .आयोगाच्या सदस्यांनी सादर केलेल्या क्षेत्रपाहणी अहवालानुसार आयोगाच्या बैठकीतील निर्णयाच्या आधारे शिफारशीबाबतचे अहवाल शासनाकडे सादर केलेले आहेत.

सदर आयोग दिनांक ३१.८.२००८ पर्यंत कार्यरत होता .मा. बापट आयोगाने अहवाल क्र.१३ ते २३ सादर केलेले आहेत.

## मा. न्यायमूर्ती (निवृत्त) डॉ. बी. पी. सराफ यांच्या अध्यक्षतेखालील आयोग

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन निर्णय क्र.सीबीसी-११/२००८/प्र.क्र.७०८/मावक-५, दि.२४.११.२००८ अन्वये मा. न्यायमूर्ती डॉ.बी.पी. सराफ,सेवा निवृत्त मुख्य न्यायमूर्ती) यांच्या अध्यक्षतेखाली ३ वर्षाकरिता आयोगाची पुनर्रचना करण्यात आली. त्यात प्रत्येक महसुली विभागातून एक सदस्य याप्रमाणे सहा महसुली विभागातून सहा सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली होती.

तसेच महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन निर्णय क्र.सीबीसी-११/२००८/प्र.क्र.७०८/मावक-५, दि.३१.१२.२०११ अन्वये सदर आयोगास मुदतवाढ देण्यात आली.

सदर आयोग दिनांक १५.५.२०१२ पर्यंत कार्यरत होता. डॉ. सराफ आयोगाने अहवाल क्र. २४ ते ४३ सादर केले आहेत.

## मा. न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. जे. एच. भाटिया यांच्या अध्यक्षतेखालील आयोग

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी ११/२००८/प्र.क्र.७०८/मावक, दि.११ फेब्रुवारी, २०१३ अन्वये मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती श्री.जे.एच.भाटिया यांच्या अध्यक्षतेखाली ३ वर्षाकरिता आयोगाची पुनर्रचना करण्यात आली. त्यात प्रत्येक महसुली विभागातून एक सदस्य याप्रमाणे सहा महसुली विभागातून सहा सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली होती.

सदर आयोग दिनांक ११.२.२०१३ ते ११.२.२०१६ पर्यंत कार्यरत होता. मा.भाटिया आयोगाने अहवाल क्र.४४ ते ५१ शासनास सादर केले आहेत.

## मा. न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. एस. बी. म्हसे यांच्या अध्यक्षतेखालील आयोग

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, असाधारण राजपत्र दि.४ जानेवारी, २०१७ अन्वये सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री.एस.बी.म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली आयोग गठित करण्यात आला. त्यात प्रत्येक महसुली विभागातून एक सदस्य याप्रमाणे सहा महसुली विभागातून सहा सदस्य व एक तज्ञ सदस्य यांची नियुक्ती करण्यांत आलेली होती. दरम्यान मा. न्यायमूर्ती श्री.एस.बी.म्हसे यांचे निधन झाले.

## मा. न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. एम. जी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालील आयोग

मा.सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री.एस.बी.म्हसे यांचे निधन झाल्यामुळे महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, असाधारण राजपत्र दि.३ नोव्हेंबर, २०१७ अन्वये आयोगाच्या अध्यक्ष पदावर न्यायमूर्ती श्री.एम.जी.गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली.

सदर आयोग दिनांक ०३.०१.२०२० पर्यंत कार्यरत होता. मा.गायकवाड आयोगाने अहवाल क्र. ५२ ते ५४ शासनास सादर केले आहेत.

## मा. न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. आनंद वसंत निरगुडे यांच्या अध्यक्षतेखालील आयोग

इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडील अधिसूचना, दि.३ मार्च, २०२१, अन्वये महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष म्हणून मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती श्री.आनंद वसंत निरगुडे यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली. दि.१५.६.२०२१ रोजीच्या अधि सुचनेन्वये प्रत्येक महसुली विभागातून एक सदस्य याप्रमाणे सहा व इतर सदस्य अशा एकूण ९ सदस्यांची नियुक्ती करण्यांत आलेली होती.

सदर आयोगाने सन २०२१ ते २०२४ या कालावधीत अहवाल क्र. ५५ व ५६ शासनास सादर केले आहेत.

# -: विद्यमान आयोगाची रचना :-

शासन अधिसूचना दिनांक ३ मार्च, २०२१ नुसार आयोगाचे मा. अध्यक्ष व दिनांक १५ जून, २०२१ च्या अधिसूचनेन्वये आयोगाचे अन्य सदस्य यांची खालीलप्रमाणे नियुक्ती करण्यात आलेली होती.

| अ.क्र. | अध्यक्ष / सदस्याचे नाव | पदनाम | प्रवर्ग | महसूल विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | न्यायमूर्ती श्री. आनंद वसंत निरगुडे | अध्यक्ष | | |
| २. | प्राचार्य श्री.बबनराव भाऊरावजी तायवाडे | समाजशास्त्रज्ञ (दि.१७.९.२०२१ रोजी राजीनामा दिल्याने रिक्त) | | |
| ३. | ॲड. श्री. चंद्रलाल व. मेश्राम (सेवानिवृत्त न्यायमूर्ती) | सदस्य | भज-ब | नागपूर |
| ४. | ॲड. श्री .बालाजी किल्लारीकर | सदस्य | इ.मा.व. | औरंगाबाद |
| ५. | प्रा. संजीव सोनावणे | सदस्य | इ.मा.व. | पुणे |
| ६. | प्रा.डॉ.श्री.गजानन खराटे | सदस्य | भ.ज.क. | नाशिक |
| ७. | डॉ.निलीमा शंकरराव सराप (लखाडे) | सदस्य | इमाव/महिला | अमरावती |
| ८. | प्रा.डॉ. गोविंद हरिबा काळे | सदस्य | खुला | औरंगाबाद |
| ९. | श्री.लक्ष्मण हाके | सदस्य | भ.ज.क. | पुणे |
| १०. | श्री.ज्योतीराम माना चव्हाण | सदस्य | वि.जा. | कोकण |
| ११. | श्रीम.आ.उ. पाटील (दि.२.१.२०२३ ते आजतागायत) | सदस्य सचिव | - | - |

तद्नंतर सन २०२३ मध्ये आयोगाचे मा.अध्यक्ष श्री.आनंद वसंत निरगुडे व अन्य काही सदस्यांनी राजीनामा दिला. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

१. न्या.श्री.आनंद वसंत निरगुडे, राजीनामा (स्वीकृत दि.४.१२.२०२३)

२. श्री. चंद्रलाल व. मेश्राम, शासनाकडून पदमुक्त दि.१३.२.२०२४)

३. ॲड.बालाजी किल्लारीकर, राजीनामा (दि.१.१२.२०२३)

४. प्रा.डॉ.संजीव सोनवणे, राजीनामा (दि.२१.११.२०२३)

५. प्रा.लक्ष्मण हाके, राजीनामा (दि.२.१२.२०२४)

मा.अध्यक्ष व अन्य सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे शासनाने अध्यक्ष व काही सदस्यांची नव्याने नियुक्ती केली. त्यानुसार **विद्यमान आयोगाची रचना** खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | अध्यक्ष/सदस्याचे नाव | पदनाम | प्रवर्ग | महसूल विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | न्या. सुनील बाळकृष्ण शुक्रे (नियुक्ती दि. १२.१२.२०२३) | अध्यक्ष | -- | -- |
| २. | प्रा.डॉ.अंबादास मोहिते, (नियुक्ती दि. १.११.२०२३) | समाजशास्त्रज्ञ | खुला | -- |
| ३. | डॉ. ओमप्रकाश शिवाजीराव जाधव (नियुक्ती दि. १२.१२.२०२३) | सदस्य | खुला | छत्रपती संभाजीनगर |
| ४. | प्रा. मच्छिंद्रनाथ तांबे (नियुक्ती दि. १२.१२.२०२३) | सदस्य | इ.मा.व. | नाशिक |
| ५. | प्रा.डॉ. गजानन खराटे | सदस्य | भ.ज.- क | नाशिक |
| ६. | प्रा.डॉ. निलीमा सराप (लखाडे) | सदस्य | महिला/इमाव | अमरावती |
| ७. | प्रा.डॉ. गोविंद हरिबा काळे | सदस्य | खुला | छत्रपती संभाजीनगर |
| ८. | डॉ. मारुती मुकींदा शिकारे (नियुक्ती दि. १२.१२.२०२३) | सदस्य | भ.क.-क | पुणे |
| ९. | श्री. ज्योतीराम मा. चव्हाण | सदस्य | वि.जा. | मुंबई |
| १०. | श्रीम.आ.उ.पाटील (दि. २.१.२०२३ ते आजतागायत) | सदस्य | -- | -- |

## -: विद्यमान आयोगाने तयार केलेले मागासवर्गीयांकरीता गुणांचे निकष :-

विद्यमान आयोगाने सन २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्यापुरते मागासलेपण ठरविण्यासाठी आयोगाने एकूण २५० गुणांचे (सामाजिक १०० गुण, शैक्षणिक ८० गुण व आर्थिक ७० गुण) निकष निश्चित केले आहेत.

या निकषांनुसार २५० गुणांपैकी ५०% पेक्षा जास्त गुण प्राप्त होणारा नागरिकांचा समूह मागासवर्गाच्या सूचीमध्ये समावेशासाठी पात्र ठरतो.

## -: आयोगाच्या कार्यालयाची प्रशासकीय रचना :-

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पद संख्या | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सदस्य सचिव | १ | १ | ० |
| २ | संशोधन अधिकारी | १ | १ | ० |
| ३ | स्वीय सहायक (राजपत्रित) | १ | १ | ० |
| ४ | उच्चश्रेणी लघुलेखक | १ | ० | १ |
| ५ | कार्यालय अधिक्षक | १ | १ | ० |
| ६ | कनिष्ठ लिपीक | २ | २ | ० |
| ७ | शिपाई | १ | १ | ० |
| | एकूण पद संख्या | ८ | ७ | १ |

* आयोगाकडे मनुष्यबळ कमी असल्याने त्याचा आयोगाच्या कामकाजावर परिणाम होत आहे.
* प्रतिनियुक्ती, नियमित नियुक्ती व कंत्राटी पध्दतीने आवश्यक कर्मचारी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

# -: महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या कामकाजाची पध्दत :-

* महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००५ (सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४) कलम ९ नुसार या आयोगाचे कामे आणि अधिकार निश्चित केले असून त्यानुसार आयोगाचे कामकाज चालते.
* विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग इत्यादी जाती जमातीच्या संघटनानी, व्यक्तींनी दिलेली निवेदने व शासनाकडून प्राप्त झालेली निवेदने आयोगासमोर ठेवून सदर निवेदनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात येते. सदर निवेदन स्विकारल्यानंतर त्याचा अभ्यास करण्यासाठी आयोगातील सदस्यांच्या विभागनिहाय उपसमितीकडे सोपविण्यात येते. त्याकरिता आयोगातील सदस्यांच्या विभागनिहाय ६ उपसमित्या तयार करण्यात आल्या आहेत.
* एखादया जाती समुहाचा मागासवर्गामध्ये (इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, (विशेष मागास प्रवर्ग) नव्याने समावेश करणे किंवा समाविष्ट असलेली जात वगळणे याबाबत खालील पध्दतीने अभ्यास करण्यात येतो.
* इंद्रा सहानी विरुध्द भारत सरकार प्रकरणामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार ज्या समाजाचा किंवा जातीचा अभ्यास करावयाचा आहे. त्यांचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक निकषांच्या आधारे अभ्यास करुन या आयोगाने निश्चित केलेल्या निकषांनुसार जातसमूह मागासवर्गामध्ये समाविष्ट करण्यास पात्र ठरल्यास त्या समूहाचा मागासवर्गामध्ये समावेश करण्याची शिफारस शासनाकडे करण्यात येते. तसेच यासंदर्भात संबंधित समूहाबाबत संदर्भ ग्रंथांमधील नोंदी, शब्दकोष, ऐतिहासिक साधने, इतर लेखी पुरावे, संस्कृती, चालीरिती व परंपरा, रहाणीमान यांचा अभ्यास केला जातो. तसेच क्षेत्रपाहणी करण्यात येते व आवश्यकते प्रमाणे जनसुनावणी घेण्यात येते. समूहाचा सविस्तर अभ्यास करुन समूहाबाबतची माहिती उपसमितीच्या सदस्यांमार्फत नोंदविण्यात येते. उपसमितीने सादर केलेल्या अहवालावर आयोगाच्या बैठकीत विचार विनिमय होऊन एखादया समूहाचा मागासवर्ग यादीमध्ये समावेश करावा किंवा कसे याबाबतचा एकमताने किंवा बहुमताने निर्णय झाल्यानंतर अंतिम अहवाल तयार करुन तो शासनाकडे सादर करण्यात येतो.
* जी प्रकरणे आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाहीत, त्यांना आयोगाकडून तसे शासनास वा संबंधित निवेदनकर्ते यांना कळविण्यात येते.

# -: आयोगाच्या बैठका :-

मा. अध्यक्ष, न्यायमूर्ती श्री. आनंद वसंत निरगुडे, (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १.४.२०२३ ते दि. १.१२.२०२३ या कालावधीत आयोगाच्या खालीलप्रमाणे बैठका झालेल्या आहेत.

| अ.क्र. | बैठक दिनांक | स्थळ |
|---|---|---|
| १ | १३.४.२०२३ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |
| २ | २०.४.२०२३ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |
| ३ | २६.५.२०२३ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |
| ४ | ८.६.२०२३ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |
| ५ | ७.७.२०२३ | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे सभागृह, नाशिक |
| ६ | २१.७.२०२३ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |
| ७ | २५.८.२०२३ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |
| ८ | ३.१०.२०२३ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |
| ९ | १८.११.२०२३ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |
| १० | २३.११.२०२३ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |
| ११ | १.१२.२०२३ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |

**मा.अध्यक्ष, न्यायमूर्ती श्री.सुनील बाळकृष्ण शुक्रे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१९.१२.२०२३ ते दि.३०.३.२०२४ या कालावधीत आयोगाच्या खालीलप्रमाणे बैठका झालेल्या आहेत.**

| अ.क्र. | बैठक निदांक | स्थळ |
|---|---|---|
| १ | १९.१२.२०२३ | विभागीय आयुक्त, नागपुर कार्यालयाचे सभागृह, नागपूर |
| २ | २७.१२.२०२३ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |
| ३ | ४.१.२०२४ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |
| ४ | १०.१.२०२४ | महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे मुंबई येथील कार्यालय मुंबई |
| ५ | १३.१.२०२४ | महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे मुंबई येथील कार्यालयातून ONLINE |
| ६ | २२.१.२०२४ | महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे मुंबई येथील कार्यालयातून ONLINE |
| ७ | २३.१.२०२४ | महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे मुंबई येथील कार्यालयातून ONLINE |
| ८ | २७.१.२०२४ | महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे मुंबई येथील कार्यालयातून ONLINE |
| ९ | ३०.१.२०२४ | महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे मुंबई येथील कार्यालयातून ONLINE |
| १० | १५.२.२०२४ | महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे मुंबई येथील कार्यालय मुंबई |
| ११ | २९.२.२०२४ | व्ही.व्ही.आय.पी.शासकीय विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे |
| १२ | १२.३.२०२४ | शासकीय विश्रामगृह, रविभवन, नागपूर येथील सभागृह |

# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग
## उपसमिती दौरा/ सुनावणी/ क्षेत्रपाहणी /बैठका

| अ.क्र. | उपससमिती | दौरा कालावधी दिनांक | दौऱ्याचे ठिकाण | दौरा तपशील | दौऱ्यास उपस्थित आयोगाचे सदस्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मुंबई | दि. ०३/०४/२०२३ | मुंबई | विद्यापीठातील शिक्षक भरती आढावा | मा. अध्यक्ष, प्रा.डॉ.श्रीम. निलीमा सरप (लखाडे), प्रा.डॉ. गोविंद काळे |
| २ | पुणे | दि. ०६/०४/२०२३ | पुणे | विद्यापीठातील शिक्षक भरती आढावा | श्रीमती सरप व प्रा. डॉ. गोविंद काळे |
| ३ | नाशिक | दि. १०/०४/२०२३ ते ११/०४/२०२३ | नाशिक | कंसारा, तारु नावाडी | प्रा.डॉ.श्री. गजानन खराटे, श्री. ज्योतिराम चव्हाण, प्रा. डॉ. श्रीम. निलीमा सरप (लखाडे) |
| ४ | मुंबई | दि. ११/०५/२०२३ ते १२/०५/२०२३ | कोल्हापूर/ सिंधुदुर्ग | लिंगायत अंबी, भाट, तिल्लोरी कुणबी | श्री.चंद्रलाल मेश्राम ॲड. बी. एल. सगर किल्लारीकर |
| ५ | पुणे | दि. २८/०५/२०२३ ते २९/०५/२०२३ | सांगली/ सोलापूर | रड्डी लिंगायत, धनगर, पारधी, तांडा वस्ती योजनांचा आढावा | प्रा. डॉ. गोविंद काळे श्री. लक्ष्मण हाके |
| ६ | छत्रपती संभाजीनगर | दि. ०५/०६/२०२३ ते ०७/०६/२०२३ | जालना/ औरंगाबाद/ बीड/ उस्मानाबाद | उंटवाले, वायंदेशी कुणबी, तांबटगर | प्रा.डॉ.श्रीम. निलीमा सरप (लखाडे), प्रा.डॉ. गोविंद काळे |
| ७ | नागपूर | दि. १९/०६/२०२३ ते २३/०६/२०२३ | नागपूर, गोंदिया, चंद्रपुर, गडचिरोली | कुजंडा, चुनावाले, भोयर, भाट, किराड, लिंगायत अंबी, कोसकांती अहिर | मा. अध्यक्ष, आनंद वसंत निरगुडे, श्री. चंद्रलाल मेश्राम, ॲड. श्री. बी. एल. सगर किल्लारीकर, प्रा. डॉ. श्री. गजानन खराटे |
| ८ | अमरावती | दि ०७/०८/२०२३ ते १०/०८/२०२३ | बुलडाणा, अकोला व अमरावती | हडगर व लखेरा, लखेरिया समाज क्षेत्रपाहणी | श्री. चंद्रलाल मेश्राम, प्रा. डॉ. श्री. गजानन खराटे प्रा. डॉ. श्रीम. निलीमा सरप (लखाडे), |

| अ.क्र. | उपससमिती | दौरा कालावधी दिनांक | दौऱ्याचे ठिकाण | दौरा तपशील | दौऱ्यास उपस्थित आयोगाचे सदस्य |
|---|---|---|---|---|---|
| ९ | छत्रपती संभाजीनगर | दि. १०.९.२०२३ ते १२.९.२०२३ | बीड औरंगाबाद | वायंदेशी कुणबी | प्रा.डॉ.श्रीम. निलीमा सरप (लखाडे), प्रा.डॉ. गोविंद काळे |
| १० | छत्रपती संभाजीनगर | दि. १३.९.२०२३ ते १४.९.२०२३ | छत्रपती संभाजीनगर | -- | आनंद वसंत निरगुडे, अध्यक्ष, ॲड. श्री. बी. एल. सगर किल्लारीकर, प्रा. डॉ. श्रीम. निलीमा सरप (लखाडे) |
| ११ | नागपूर | दि. २७.१०.२०२३ ते २८.१०.२०२३ | नागपूर, चंद्रपूर जिल्हा | -- | श्री.चंद्रलाल मेश्राम |
| १२ | अमरावती नागपूर | दि. २४.११.२०२३ ते २६.११.२०२३ | अमरावती, नागपूर | -- | श्री.चंद्रलाल मेश्राम |
| १३ | लातूर | दि. ३.१२.२०२३ ते ६.१२.२०२३ | लातूर धाराशीव | -- | प्रा. डॉ. गोविंद काळे श्री. लक्ष्मण हाके |
| १४ | नागपूर | दि. २७.१.२०२४ ते ३१.१.२०२४ | नागपूर, गोंदिया, चंद्रपूर | -- | न्या.श्री.चंद्रलाल मेश्राम |
| १५ | नाशिक | दि. ३१.१.२०२४ ते १.२.२०२४ | नाशिक | -- | प्रा. डॉ. श्री. गजानन खराटे प्रा.डॉ.श्रीम. निलीमा सरप (लखाडे) |

**सन २०२३-२४ या कालावधीमध्ये आयोगाच्या उपसमित्यांच्या एकूण १५ दौऱ्यांमध्ये विविध जातसमुहांच्या सुनावण्या, बैठका, चर्चा व क्षेत्रपाहणी करण्यात आली. सुनावणीस त्या त्या जातीच्या संघटना प्रतिनिधी संबंधित व्यक्ती उपस्थित होत्या. त्यापैकी बऱ्याच प्रकरणांमध्ये अभ्यासाअंती अहवाल सादर करण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात असून लवकरच शासनास अहवाल सादर करण्यात येईल.**

# मराठा समाजाच्या मागासलेपणाबाबतचा अहवाल

महाराष्ट्र शासनाकडील दि.१३.११.२०२३ रोजीच्या पत्रानुसार मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याचे कामकाज महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे सोपविण्यात आले. सदर कामकाजाच्या अनुषंगाने Terms of References आयोगास उपलब्ध करुन देण्यात आले. त्यानुसार आयोगामार्फत शहरी व ग्रामीण भागातील मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील जातींचे सर्वेक्षण करुन माहिती गोळा करण्याचे नियोजन करण्यात आले. सर्वेक्षणासाठी Software Aplication तयार करणे, सर्वेक्षणाचे प्रशिक्षण देणे, माहिती गोळा करणे तसेच विश्लेषण करणे या कामाकरिता आयोगाने गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे या संस्थेची नियुक्ती केली. सर्वेक्षणासाठी मागासलेपणाचे निकष व प्रश्नावली तयार करण्यात आली.

सदर कामकाजाच्या अनुषंगाने आयोगाने दि.३.१०.२०२३, १८.११.२०२३, २३.११.२०२३, १.१२.२०२३, १९.१२.२०२३, २७.१२.२०२३, ४.१.२०२४, १०.१.२०२४, १३.१.२०२४, २२.१.२०२४, २३.१.२०२४, २७.१.२०२४, ३०.१.२०२४ व १५.२.२०२४ या दिवशी बैठका घेऊन कामकाज पूर्ण केले.

सर्वेक्षणासाठी १,९६,२५९ प्रगणकांच्या, १४,०४० पर्यवेक्षक तसेच जिल्हा, महानगरपालिका, तालुका व वॉर्ड स्तरावर Nodal Officer, Assitant Nodal Officer तसेच प्रशिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. दिनांक २०,२१,२२ जानेवारी २०२४ या कालावधीत सर्वेक्षणासाठी नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले.

दिनांक २३.१.२०२४ ते दि.२.२.२०२४ या कालावधीत राज्यभरात प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम करण्यात आले. सर्वेक्षणाद्वारे प्राप्त माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे या संस्थेने केले. मराठा समाजाच्या मागासलेपणाबाबतचा अहवाल आयोगाने तयार करुन दिनांक १६.२.२०२४ रोजी शासनास सादर केला.

# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे

## -: सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील खर्चाची माहिती :-

## सन २०२३-२४

| अ.क्र. | योजनेने नांव | सांकेतांक क्रमांक | प्रत्यक्ष खर्च रुपये |
|---|---|---|---|
| १ | वेतन | २२२५-एफ-३५२ (०१) | ८२६७६७४ |
| २ | दुरध्वनी/वीज खर्च | २२२५-एफ-३५२ (०६) | १२३८६ |
| ३ | कंत्राटी सेवा | २२२५-एफ-३५२ (१०) | ९७९२११९८ |
| ४ | प्रवास खर्च | २२२५-एफ-३५२ (११) | १३०१७६७ |
| ५ | कार्यालयीन खर्च | २२२५-एफ-३५२ (१३) | ११४५००१३० |
| ६ | व्यावसायिक सेवा | २२२५-एफ-३५२ (२८) | ० |
| ७ | इतर खर्च | २२२५-एफ-३५२ (५०) | ० |
| | एकूण :- | | ११०,३२,९३,९५५ |